संच निश्चिती

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ ५५१/२०१२
पुणे १ दिनांक– ०२/०८/२०१२

प्रति,

मुख्याध्यापक
संत सावतामाळी प्राथ. विद्यालय (इंग्रजी माध्यम), डोर्लेवाडी,
ता. बारामती, जि. पुणे – ४१३१०२, महाराष्ट्र.

विषय :- सन २०१२-१३ या वर्षातील खाजगी अनु./अंशतः/विना. कायम विना अनुदानित मान्यता प्राप्त शाळेतील शिक्षक पदसंख्या निश्चिती इयत्ता निहाय तुकड्या मान्यता शिक्षक मान्यता इत्यादी बाबत.

संदर्भ :- १. शासन निर्णय क्रमांक पीआरई /१०९३ /२२१/प्राशि १ / दि. ३०.०१.१९९६
२. शासन निर्णय क्रमांक पीआरई /२००५/४३३७/प्राशि-१ दि.२६.०५.२००६
३. शासन निर्णय क्रमांक पीआरई /१०९३/२९१/प्राशि-१ दि. ३०.०५.१९९६
४. शासन निर्णय क्रमांक विएलएस/१००२/(१००२/०२)२९१/प्राशि-३/दि.१४.०५.०३
५. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद पत्र क्र.मप्रशिम/सहा/०७/०८/३६३०/दि.१८.०७.०७

१. आपल्या खाजगी प्राथमिक शाळेतील सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षातील ०१.०८.२०१२ ची इयत्ता निहाय विद्यार्थी पट उपस्थिती नुसार आपल्या शाळेस सन २०१२-१३ या क्षणिक वर्षातील कायम विना अनुदान तत्वावर सोबतच्या तक्तात क्र.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे इयत्ता निहाय तुकड्यांना मान्यता देण्यात येत आहे.
२. तक्ता क्रमांक २ मध्ये इयत्ता निहाय विद्यार्थी पट उपस्थिती व तुकड्यांची संख्या विचारात घेवून आपल्या शाळेस सन २०१२-१३ या क्षणिक वर्षातील मुख्याध्यापक/ शिक्षक/पदवीधर शिक्षक पदांना मान्यता देण्यात येत आहे.
३. शाळेची पटसंख्या कमी झाल्याने अनुज्ञेय होणा-या तुकडया व शिक्षकांची संख्या तक्ता क्रमांक १ मधील रकाना क्रमांक ७ मध्ये दर्शविली आहे. अतिरीक्त शिक्षक ठरल्यास त्याची माहिती ठरवून दिलेल्या नमुन्यात या कार्यालयास सादर करावी.
४. मान्य तुकडया व वर्ग व्यतिरिक्त कोणत्याही परिस्थितीत ज्यादा तुकडया व वर्ग चालू ठेवण्यात येऊ नये, मंजूर न झालेल्या तुकडया व वर्गाच्या संदर्भात नियुक्त केलेल्या शिक्षका/शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या वेतनाची जबाबदारी शासन घेणार नाही. तसेच नामंजूर तुकडयामधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस शासन जबाबदार राहणार नाही.
५. ज्या कर्मचा-यांना मान्यता देण्यात आलेली नाही अशा कर्मचा-यांचे प्रस्ताव ठरवून दिलेल्या कार्य पध्दतीनूसार शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठवावेत.
६. शाळेने आपल्या अधिकारात ५० पेक्षा जास्त विदयार्थ्यांना प्रवेश देवून नये. शिक्षणाधिकारी.(प्राथमिक) यांचे पुर्व परवानगीने विदर्थी संख्या ६० पर्यंत वाढवता येईल.
७. विना अनुदानित /कायम विना अनुदानित शाळांतील शिक्षकपदी कार्यरत असणा-या पदावर एच.एस.सी. डि. एड. अर्हतेचे शिक्षक नियुक्त करणे बंधनकारक आहे व त्यांच्या नियुक्तीला या कार्यालयाकडून मान्यता घेणे बंधनकारक आहे.
८. कायम विना अनुदानित विदयार्थ्यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर प्रतिस्वाक्षरीसाठी शाळेतील मान्य कर्मचा-याला पाठवावे, तसेच मुख्याध्यापक पदी या कार्यालयाने मान्य केलेल्या मुख्याध्यापकाची नावानिशी मान्यता, संच मान्यतेची प्रत पाठविणे आवश्यक आहे.
९. दि.०५/०२/२००० च्या शासन निर्णयानुसार जून २००० पासून जनरल रजिस्टर व शाळा सोडल्याच्या दाखल्यावर विदयार्थ्यांच्या आईचे नाव अनिवार्य आहे. आईच्या नावाचा उल्लेख नसलेल्या दाखल्यावर तसेच अनुक्रमांक ८ वरील बाबींची पुर्तता न करणा-या शाळांच्या दाखल्यावर प्रती स्वाक्षरी केली जाणार नाही.



पुढे चालू.........

संस्थेचे नाव — कै. मधुकरराजे निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, बारामती
शाळेचे नाव — संत सावतामाळी प्राथ. विद्यालय (इंग्रजी माध्यम), डोर्लेवाडी, ता. बारामती, जि. पुणे — ४१३१०२, महाराष्ट्र.
शाळा मान्यता क्र. — ड/५१२ (ब)/३७२८ दि. ०८/१०/२००९
शाळा परवानगी वर्ष — शैक्षणिक वर्ष २००९-१०
माध्यम — इंग्रजी

तक्ता क्रमांक १

सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता निहाय तक्ता

| इयत्ता | पट ०१/०८/२०१२ | उपस्थिती | सन २०११-१२ मधील मंजूर तुकड्या | | | सन २०१२-१३ मधील मंजूर तुकड्या | | | पट संख्येने कमी होणा-या तुकड्या | पट संख्येने कमी होणारे शिक्षक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| | | | अनुदानित | विना अनुदानित | कायम विना अनुदानित | अनुदानित | विना अनुदानित | कायम विना अनुदानित | | |
| १ ली | ४१ | ४१ | - | - | ०२ | - | - | ०२ | - | - |
| २ री | ४४ | ४४ | - | - | ०२ | - | - | ०२ | - | - |
| ३ री | ४७ | ४७ | - | - | ०१ | - | - | ०१ | - | - |
| ४ थी | ३५ | ३५ | - | - | ०१ | - | - | ०१ | - | - |
| एकूण | १६७ | १६७ | - | - | ०६ | - | - | ०६ | - | - |

तक्ता क्रमांक २

सन २०१२-१३ खाजगी प्राथमिक शाळेतील मान्य केलेल्या पदांची संख्या

| अ.क्र. | प्रकार | सन २०११-१२ मधील मंजूर झालेल्या पदांची संख्या | | | सन २०१२-१३ मधील मंजूर केलेल्या पदांची संख्या | | | कमी झालेली पदे | जादा झालेली पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | अनुदानित | विना अनुदानित | कायम विना अनुदानित | अनुदानित | विना अनुदानित | कायम विना अनुदानित | | |
| १ | मुख्याध्यापक | - | - | - | - | - | - | - | - |
| २ | उपशिक्षक | - | - | ०६ | - | - | ०४ | - | - |
| ३ | पदवीधर | - | - | - | - | - | - | - | - |
| ४ | लिपिक | - | - | - | - | - | - | - | - |
| ५ | परिचर/शिपाई | - | - | - | - | - | - | - | - |
| | एकूण | - | - | ०६ | - | - | ०४ | - | - |

टिप — १. संच निश्चिती करत असताना रिक्त पदे - ००

२. अतिरिक्त कार्यरत पदे व नाव — पदे - ०० नाव - ००

३. अशातः अनुदानित, विना अनिदानित, शाळांना रिक्त असलेल्या व रिक्त होणा-या पदावर या कार्यालयाची लेखी परवानगी घेतल्या शिवाय रिक्त पदावर नेमणूक करु नये.

शिक्षणाधिकारी-(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे